# उन्मेष

# आणि

# उद्रेक

REFBK-0007482
REFBK-0007482

भ. श्री. पंडित

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

৭৫৫০
কা১০৭ ৭২১১
১৩৫৫৮
স্বাগত

# उन्मेष आणि उद्रेक

[ कवितासंग्रह ]

REFBK-0007482
REFBK-0007482

भवानीशंकर श्रीधर पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 7482
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

सं.
स्थळ प्रत

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

* ६८ *

मूल्य अडीच रुपये

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९५०

मुद्रक : श्री. मा. दळवी,
कल्पना प्रिंटिंग प्रेस,
दादर, मुंबई १४

प्रकाशक : के. भि. ढवळे,
श्री समर्थ-सदन,
गिरगांव, मुंबई ४

कैलासवासी
आई आणि नाना
ह्यांच्या
पुण्यस्मृतींस —

# आरंभीं

माझ्या कवितांचा हा दुसरा संग्रह पहिल्या संग्रहानंतर सतरा वर्षांनीं प्रकाशित होत आहे. तो पहिल्या संग्रहाप्रमाणेंच महाराष्ट्राच्या रसिक वाचकांस आवडेल अशी अपेक्षा आहे. आरंभींच्या सात कविता गेल्या संग्रहांत नव्हत्या. ह्यांतील बहुतेक कविता त्यांच्या लेखनकालीं निरनिराळ्या नव्याजुन्या नियतकालिकांतून प्रसिद्धी पावल्या आहेत.

एकोणीसशें बावीस सालापासून माझें कवितालेखन अव्याहत चालू आहे. गेल्या अठ्ठावीस वर्षांत मीं अनेक कविता लिहिल्या आहेत. त्या सर्वच रसिकांसमोर ठेवण्याच्या योग्यतेच्या नाहींत. शिवाय मर्यादित पृष्ठसंख्येंत कांहीं योग्यतेच्या कविताही बाजूस ठेवणें अनिवार्य झालें आहे.

माझ्या गेल्या संग्रहास मीं 'पिचलेला पावा' हें नांव दिलें होतें. कारण तो काळ काव्यगायनाच्या टुमीचा होता. मला स्वतःला गळा नसल्यामुळें मी तें अन्वर्थक नांव निवडलें होतें. ह्या संग्रहास 'उन्मेष आणि उद्रेक' हें नांव दिलें आहे. व्यक्तीचा स्वभाव स्थिर असतो. परंतु वृत्ति तात्कालिक असते. वृत्ति हळुवार असतांना जो आविष्कार होतो, तो फुलाच्या उन्मेषाप्रमाणें कोमल व संथ असतो. उलट वृत्ति कणखर असतांना जो आविष्कार होतो, तो झऱ्याच्या उद्रेकाप्रमाणें जोरदार व वेगवान् असतो. कवितेच्या निर्मितीच्या मुळाशीं वृत्तीचे हे दोन्ही प्रकार असतात, हें लक्षांत घेऊन मीं ह्या नांवाची योजना केली आहे.

ह्यापुढल्या माझ्या कवितांस एक नवें वळण मिळालें आहे. त्यांचें हस्तलिखित सिद्ध आहे. योग असेल तर तेंही रसिकांना लवकरच सादर करण्याचें आश्वासन देऊन ठेवतों.

भ. श्री. पंडित

श्रीधरसदन – श्रद्धानंदनगर,
अंजनीअंबाझरी रस्ता,
नागपूर–अंजनी, सोमवार, १०–७–१९५०

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | कृष्णे ! तुला प्रार्थना | १ |
| २ | हिंडावें गगनांत – | २ |
| ३ | दगडांच्या खाणीजवळ | ३ |
| ४ | त्यांच्या समाधीपुढें | ४ |
| ५ | देवी स्वतंत्रते ! | ५ |
| ६ | ओलेतीस – | ६ |
| ७ | मी व्यर्थ वैतागलों | ८ |
| ८ | मायाविनीस | ९ |
| ९ | विरहविलाप | १० |
| १० | गेले ! ते दिन गेले !! | ११ |
| ११ | 'एकजीव होइलना ?' | १२ |
| १२ | भयविवशा | १३ |
| १३ | फुलपाखरूं आणि पतंग | १४ |
| १४ | केतकी आणि नाग | १५ |
| १५ | प्रणयप्रलाप | १९ |
| १६ | कलहान्तरिता | २० |
| १७ | त्यागी उपेक्षिता | २१ |
| १८ | बघ! बाल विभाकर ये उदया | २२ |
| १९ | जो जो जो कलिके ! | २३ |
| २० | मूर्तिमती पूर्णिमा | २४ |
| २१ | डोळे हे सखि ! | २५ |
| २२ | लाविं विलंब न | २६ |
| २३ | शुभमंगल दिन | २७ |
| २४ | निद्रावश रमणी | २८ |
| २५ | माझी प्रिया सांवळी ! | २९ |
| २६ | कां इतुका थरकांप ? | ३० |
| २७ | कुढ्या जीवास – | ३१ |
| २८ | उजाड माळ | ३२ |
| २९ | प्रेम व व्यवहार | ३३ |
| ३० | परित्यक्ता | ३४ |
| ३१ | चारुचंद्रिके ! – | ३६ |
| ३२ | टाकुन मज जासि कुठें ? | ३७ |
| ३३ | प्रतिमा | ३९ |
| ३४ | वर्गवैषम्य | ४० |
| ३५ | तुझें चलनवलन | ४१ |
| ३६ | अपत्यसंभव | ४२ |
| ३७ | तुला न ओळखलें | ४३ |
| ३८ | प्रणयप्रभात | ४४ |
| ३९ | विरंगुळा | ४५ |
| ४० | कसें धरावें तुज हातीं ? | ४६ |
| ४१ | — तूंच ! | ४७ |
| ४२ | पुरापासून दूर | ४८ |
| ४३ | सहसंचार | ४९ |
| ४४ | घराकडे परततांना – | ५० |
| ४५ | हास हास तारे ! | ५१ |
| ४६ | क्रान्तिस्तोत्र | ५३ |
| ४७ | प्रेममंदिर | ५४ |
| ४८ | आला पर्जन्यराज | ५५ |
| ४९ | जातिल जातिल निघुन हेहि दिन | ५६ |
| ५० | आजच्या मानवतेस – | ५७ |
| ५१ | त्याग ! | ५८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | तशी मुळीं मी नाहीं | ५९ | ६२ | संसारसंगीत | ७४ |
| ५३ | प्रवाश्यास – | ६० | ६३ | राजकवि तांबे यांस | ७५ |
| ५४ | मनुजा ! हास हास | ६१ | ६४ | गृहसम्राट् | ७६ |
| ५५ | कुठेंतरी दूर – | ६३ | ६५ | खेळव चिमणा माझा | ७८ |
| ५६ | श्रमजीवी: | ६४ | ६६ | ओसाड घर | ७९ |
| ५७ | वियोगिनी | ६५ | ६७ | नाजूक गुल्बशी | ८१ |
| ५८ | घराकडे – | ६६ | ६८ | कामकऱ्यांचें गाणें | ८२ |
| ५९ | कलिकुबेर | ६८ | ६९ | फुलास | ८३ |
| ६० | युगांतर | ७० | ७० | एक चित्र ! | ८४ |
| ६१ | आज | ७२ | ७१ | ये वसंत ! ये, ये | ८५ |

संग्रहांत नजरचुकीनें पुढील अशुद्धें
राहिलीं आहेत. तीं सुधारून घ्यावींत.

| अ. क्र. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५ | निर्गुणा | निर्घृणा |
| १६ | रात | रत |
| १९ | बा | गा ! |
| २५ | बसे | वसे |
| २५ | सारत्य | सारल्य |
| २६ | कां इतुका थरकांप | कां इतुका थरकांप ? |
| ३४ | सत्तामत्ताविद्वत्तांत | सत्तेमत्तेविद्वत्तेंत |
| ४४ | मजसाठीं | मजसाठिं |
| ५३ | हळुहळु हो लुप्त निशी, सुप्रभात – | हळुहळु हो लुप्त निशी, मंदमंद होत शशी, सुप्रभात – |
| ६४ | ताईस | ताइस |

# .१. कृष्णे ! तुला प्रार्थना

[ शार्दूलविक्रीडित

त्वत्तीरीं पद ठेवतांच उठती रोमांच आनंदुनी,
जातें हर्षभरें क्षणांत अवघें ब्रह्मांडही कोंदुनी,
येतो ऊर उचंबळून फुटते नेत्रांतली वाहिनी,
कृष्णे ! खास तुझ्या जलांत वसते कांहींतरी मोहिनी.

नोहे हा सलिलौघ–हा दिसतसे शाद्व निळा साजिरा
हा पाहून तुझ्या तनूवर पिसें लागेल रत्नाकरा ;
या वीचींवर वीचि उंच उठती जाती पुन्हां खालतीं
शाद्वचे सळ हे सलील अथवा वाऱ्यामुळें हालती !

देखावा असला मनोरम यदा मी पाहतों लोचनीं
होतें भान क्षणैक नष्ट, सहसा येतें असें मन्मनीं,
'द्यावें त्रस्त जिवास या शरण तूं नीलांचलाखालतीं'
तेथें स्वस्थ मिळेल झोप मजला येईल ना जागृती.

ज्यापासून मदीय पिंड उपजे पात्रीं तुझ्या ते कण
माझ्या सर्व नसांनसांतुन भिने माते ! तुझें जीवन
लोकीं दूर कुठें जरी निवसलों सर्वस्व तूं या जना
लोटूं दूर नको मला जवळुनी कृष्णे ! तुला प्रार्थना.

वाई, २९.६.२६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ७४८२
शाखा

# .२. हिंडावें गगनांत –

[ सुनीत

नैऋत्येकडल्या नगावरुनिया आतां पठारावरी –
ये स्वच्छंद सलील वाहत धुकें हें पांढरें पांढरें,
ईशान्येकडल्या नगावरुन तें आतां कसें संचरे,
आतां जाइल ओसरून सगळें अदृश्य कोठेंतरी !

जातां येथुन ईषदेक पडला पर्जन्य; तों भोवतीं –
आले ओहळ वाहुनी थुई थुई, ओलावला माळ हा
सोनेरी पिवळीं उन्हें पसरलीं चोंहीकडे तों – अहा !
आनंदें उडुं लागले खग नभीं चौफेर चक्राकृती.

आतां दूर कुठें नगावर, कुठें वृक्षावरी उन्नत
होई गोचर पांढऱ्या तरळल्या धूम्राप्रमाणें धुकें
अन् वाऱ्यावर डोलती सळसळा खोऱ्यांत खालीं पिकें
धावे गर्जत त्यांतुनी खळखळा कृष्णा समुद्राप्रत.

‘हिंडावें गगनांत होउन धुकें’ वाटे मला अंतरीं !
‘अन् शोभा असतां पहात विरुनी जावें अनंतोदरीं ! !’

नागपूर, २७.८.२६

## .३. दगडांच्या खाणीजवळ

[ दिंडी

प्रांत अवघा हा बरड डोंगराळ
उंच कोठें, सम कुठें, कुठें खोल;
भोंवतालीं ना झाड ना झुडूप
पिण्यासाठीं मग कुठुन मिळे आप ?

तहानेनें जिव जाइ व्याकुळून
नेत्रिं सरिता तों येति ओघळून
गिळुन त्यांच्यांमधलेच दोन आसू
कंठ कोरडला ओलवी पिपासू.

करी दिनभर परि काम हा मजूर
किती याचें मजबूत हाडपेर !
चिरे गेले भूमींत खोल खोल
खणुन काढी हा सर्व ते समूळ ;

आणि निढळाचा पुशित चिंब घाम
हात पसरुन धनिकास म्हणे, " दाम "
हात याचा छे ! दगड जोरदार !
हृदय त्याचें छे ! दगड तें कठोर ! !

सूरसागर ( मारवाड ), ३०.४.२७

## .४. त्यांच्या समाधीपुढें

[ सुनीत

संबोधो कुणि बंडखोर म्हणुनी स्वातंत्र्यवीरांस या !
यांना कोणि खुनी अराजक गणो ! देवो शिव्याशाप वा !
राष्ट्राच्या मृत वाहिन्यांत भरला उत्साह यांनीं नवा !
सत्तेला परकी झुगारुन दिलें स्फूर्तीबलें आपुल्या ! !

बंधू ध्येयपथांत व्यर्थ पडले जे आडवे येउनी –
केला तत्प्रतिकार ! – आणि पथ तो निश्चित चोखाळला !
सत्तेनें चिडुनी तदा जखडिल्या पायीं दृढ शृंखला !
त्वेषें डांबुन टाकिले सरसहा कारागृहीं नेउनी ! !

तेथेंही अति दुःखदायक जिणें कंठीत देशास्तव –
श्रद्धेची पकडून कास अवघे आशेवरी राहिले !
हर्षे आणि स्वजन्मभूजननिचें केलें महागौरव –
अन्यायक्रतुभीतरीं वितरुनी स्वप्राण तेजागळें !

एवं जे निज जन्मभूस्तव बळी गेले हुतात्मे सडे !
प्रत्यब्दीं नमतील लोक शिरसा त्यांच्या समाधीपुढें ! !

नागपूर, ५.१०.२९

# .५. देवी स्वतंत्रते !

[ सुनीत

केव्हां तोडुन ताडताडकन या पायांतल्या श्रृंखला –
भोगाया सुखसोहळा अवशते ! होईन मी मोकळा ?
हातांना जखडून घट्ट बसती या निर्गुणा अर्गला –
केव्हां फेकिन खंड खंड करूनी मी त्या चहूंबाजुंला ?

बोलाया निज सत्य भाव वळते जिव्हा कितीदांतरी –
केव्हां टाकिन मोडुनी कुलुप मी तीतें बसे जें परी ?
नाना नित्य नवे विचार सुचती बुद्धिप्रती देवते !
केव्हां मी पटवून देइन जनां स्वच्छंद होऊन ते ?

दृष्टीला दिसतें सदोदित पुढें तें भव्य त्वन्मंदिर !
मूर्ती दिव्य तुझी तयांत विलसे सिंहासनीं सुंदर ! !
' यावें बंध झुगारुनी तुजकडे ' चित्तांत येतें असें,
दास्याच्या उलट्या परिस्थितिपुढें सारें परंतु फसे !

दुर्दैवें परतंत्रतेंत वपु हें माझें जरी भंगलें
निष्ठा अव्यभिचारिणी तरि असे पायीं तुझ्या मंगले !

नागपूर, २८.८.३२

## .६. ओलेतीस –

[ सेवि रविकरा

स्नातदेवते !
चैल विरल ओलेतें ! –
गाढालिंगन
तेंवी वेढुन –
देहिं राहि तें.

शारदीय नीलांबर
त्यासम तें नयनरुचिर
दावी आंतिल
कांती उजळ
सहज दृष्टितें.

लपविति किति किति तरंग
कमलिनिचें नितळ अंग
येती दिसुन
तीचीं काय न –
विविध विलसितें ?

गौर पार्श्व सप्रमाण
चित्रलिखित काय आन ?
साजें पातळ –
रेखावर्तुल
कटिसभोंवतें.

उन्नत पीवर उरोज –
लाजुन लपले सरोज !
घेतां मुरड
होती सुघड –
अर्ध उघड ते.

विखरुन कचनिचय विपुल
ठिबकति जलबिंदु अमल
पेंडें तुटुन
मोत्यें सांडुन –
होय जणुं रितें !

बघती हें काय नयन –
सुंदर साकार स्वप्न ?
येसी घेउन
शोभा सगुण –
काय ? प्रतिरते !

नागपूर, १७.५.३३

घातळ–बारीक

# .७. मी व्यर्थ वैतागलों

[ सुनीत

गे ! ओठांवर शब्द अस्फुट असे आले कितीदां तरी
कंठाच्या नलिकेंतची जिरविलें मीं ते विवेकें परी
वारंवार तरी मला डिवचिलें एक्या मनें आग्रहें
सारें मीं दुसऱ्या मनें निभवुनी नेलें परी निग्रहें ;

दुःखाची परमावधी सहृदये ! झाली परी शेवटीं
झालों चोहिंकडून त्रस्त अगदीं मी वाढल्या संकटीं
आवेगांत तरारलीं थरकुनी नेत्रच्छदीं आंसवें
कोणाला यमयातना निशिदिनीं ताई ! अशी सोसवे ?

आत्मत्वें समजूत घालुन परी तूं धीर मातें दिला
त्यायोगें मम श्रांत जीव सहजीं सोत्साह विश्रब्धला
कर्माची निरपेक्षता पटुन मी काल क्रमूं लागलों
झालें जीवित धन्य ! आणि गमलें, मी व्यर्थ वैतागलों.

आशावादच कीं जणुं प्रगटला दुर्दम्य माझ्यापुढें
मानावें भलतें कशास मग मी कीं आयु हें सांकडें ?

नागपूर, २९.५.३३

## .८. मायाविनीस –

[ भूपाळीप्रमाणें

गळ्यांत घालुन गळा कशाला मला लाविसी लळा ?
काय मनीं समजसी असे कीं असाच हा दुधखुळा ?
दूर जरा सरकतां कवळिसी कशास मज मागुतां ?
कां ओठावर ओठ ठेवुनी भुलवुं बघसी वृथा ?

नजरेंत नजर कां गुंतविसी लाघवी ?
पंजांत अडकविसि पंजे कां आर्जवीं ?
गोड गोड बोलुनी पाडसी कशास मज मोहिनी ?
मानभाविपण तुझें हें न मज नवें जादुगारिणी !

स्मित अधरावरि परी परजली खरी अंतरीं सुरी
कृती तुझी ही स्तब्ध मी जरी मजला परिचित तरी;
सागर जरि हासला उल्हसित वरकरणीं भासला
खोल तरी मानसीं राहि तो सदैव हिरमुसला;

या प्रणयपंजरीं आजवरी मी फसें,
मज मारुतमंडल ढगाळलेलें दिसे –
फडफड तडफड किती यापुढें नको नको लेश ती
मुक्तविहग अंबरीं भरारी मारिन मी संप्रती.

माझगांव-मुंबई, २२.१०.३२

# .९. विरहविलाप

[ गज़ल

जाहली वृथा आधीं भेट आपुली राया !
आणि स्नेह दोघांचा वाढला पुढें वाया.

प्रेमबीज त्यायोगें
रोपलें हृदीं वेगें
वृक्ष होउनी त्याचा अर्पु लागला छाया.

शीतशांत त्या जागीं
रंग खेळलों संगीं
घेतली जिवांलागीं लावुनी खुळी माया.

स्वैर कोकिळावाणी
गोड गाइलीं गाणीं,
वन्य पत्रपुष्पांच्या सेविल्या मऊ शय्या.

आणि कल्पनाकूर्चीं –
रम्य भाविकालाचीं –
रेखिलीं पटीं चित्रें अक्षया स्मृतींच्या या.

तों वियोग होई हा
काळवंडती तीं - हा !
ऊर भिन्नतातापें लागती दुभंगाया !

नागपूर, १५.११.३३

## .१०. गेले ! ते दिन गेले ! !

[ साकी

वेगवेगळीं फुलें उमललीं
रचुनी त्यांचे झेले
एकामेकांवरी उधळिले
गेले ! ते दिन गेले ! !

कदंबतरुला बांधुन दोला
उंच खालतीं झोले
परस्परांनीं दिले घेतले
गेले ! ते दिन गेले ! !

हरित बिलोरी वेलबुटी वरि –
शीतरसांचे प्याले
अन्योन्यांनीं किती झोकले
गेले ! ते दिन गेले ! !

निर्मलभावें नव देखावे
भरुनी दोन्ही डोळे
तूं मी मिळुनी रोज पाहिले
गेले ! ते दिन गेले ! !

नागपूर, ३१.१२.३२

## ११. एकजीव होइलना ?

[ उघडि नयन रम्य उषा

'एकजीव होइलना आपुला ? शुभांगे !
जुळतिलना उभयांचीं विलग अंतरंगें ?' –

सहज मिटुन नयनयुगल
लांबवून चरण मृदुल
भावहंस हाच विमल
मानसीं तरंगे.

विकसित सित पक्षपटें
आलोहित चंचुपुटें
कंठनाल उरफाटें
घडविला अनंगें.

वर गभीर गगन नील
सलिल उदरतलिं सलील
भंवतालीं शांतिशील –
मलयवात गुंगे.

संध्येची कांति जशी
रजनीच्या रजतरसीं
एकरूप होइ तशी
होशिलना संगें ?

नागपूर, ११.१.३४

# .१२. भयविवशा

स्थळ प्रत
[ अप

भयविवश उभी कां दूर तशी ?
चल, येना ! माझ्याजवळ अशी.

चोरुन घेसी कां कटिवलया ?
कां हो पुलकित अवचित काया ?
केंवि कळेल न भाव करा या ?
मति अननुभवी राहील कशी ?

कां प्रतिबिंबे नयनीं शंका ?
विस्मय वदनीं अवलंबे कां ?
हृदयाचा कां होई थरका ?
कां विचलित बघसी हरिणि जशी ?

नीलांबरगत मंद मोहका –
हसती तुजला तनकतारका !
अक्षय त्यांच्या समक्ष नच कां –
रमणीय रोहिणीनिकट शशी ?

ठेव उराच्या उबेंत माझ्या
मृदुल सुगंधित तव कचनिचया
होऊं दे क्षण धुंद वृत्ति या !
कर खुशाल माझा ऊर उशी !

नागपूर, ६.२.३४

# .१३. फुलपाखरूं आणि पतंग

[ भूपाळीप्रमाणें

फुलपाखरा ! खरा गडी तूं रंगेला साजिरा
आजउद्याची कांहिं कशाची तमा न तुजला जरा !
निलाजरा हिंडसी उपवनीं नवकलिका धुंडिसी
मनास येतिल खुशाल त्यांचे मधुराधर खंडिसी !
क्षण हिला चुंबिसी, क्षण तिजला झोंबसी,
क्षण झिंगत करिशी प्रदक्षिणा लांबशी,
क्षण झोक जाउनी कुठेंतरी थांबसी;
प्रेम तुझें हें असें क्षणिक वा वैचित्र्यप्रिय दिसे
अजाण कलिका मुळीं तयांना त्यांचें कांहीं नसे !

स्नेहलता उज्ज्वला कांतिशीं तिच्या न कनका तुला
जंतरमंतर करुन गोंवि ती स्नेहिं पतंगा ! तुला
वरतीं नी खालतीं तूं किती गिरगिरसी भोंवतीं
जगीं न कवणा तुझ्याप्रमाणें प्रियाराधनीं रती !
क्षण जवळ राहसी, दुरुनी क्षण पाहसी,
क्षण पंख वाजवुन, ‘ये-चल-ये’ बाहसी,
परि अंतीं घालुन झेप प्राण वाहशी;
प्रेम तुझें हें असें चिरंतन एकनिष्ठ वा दिसे
स्नेहलता जाणती पण तिला त्याचें कांहीं नसे !

नागपूर, २६.२.३४

## .१४. केतकी आणि नाग

[ सृष्टीचा लडिवाळ

गर्द रान मातलें, रातली त्यांत जर्द केतकी
सोनें बावनकशी किटावें अशी तिची तकतकी
नवमीला काजळ्या खुलावी चांदुकली पांढरी
हिरव्या राइंत तशी हुबेहुब पिवळी ती साजरी
तिजलागीं कवळिती सकाळीं दिनकरकर कोंवळे
कांचनकांती तिची तेधवां आगळीच झळझळे.

बांधा गोंडस तिचा सारखा, उभार, सडपातळ
कणसाचें शिर सजे शिरासम, पातीं जणुं कुंतल
लेई ती भरजरी कधीं मउ सोनसळी पातळ
आणि कधीं पांढरें, ढग जमा शरदाचा निर्मळ
भाद्रपदीं, श्रावणीं कोसळे मृगआर्द्रांचें जळ
शिणगाराचे तिच्या सोहळे पुरति तदां पुष्कळ.

रूप तिला लाभलें रतीनें लोभावें यापरी
नव यौवन त्यावरी पडुन भरिं द्विगुणित त्याला करी
रानवटीं एकटी नसावें भय कवणाचें मुळीं
म्हणुनी पातीं तिनें परजलीं काटेरीं आपुलीं
आणि जगाजवळुनी राहिली बरी वेगळी दुरी
गुणसुवास परि तिचा पसरला निसरत वाऱ्यावरी.

सरसर वळसे घेत घेत कुणि नाग निघाला जवें
वास तिचा नेमका समजला त्यास सुवासासवें

प्रवाह पातळ काय चालला रजताचा वाहता !
दूड मण्यांची वा ओघळली कंठा होउन रिता !!
त्यास कुणी हटकलें, कुणी झटकलें पथीं चालतां
तमा जनाची लाज मनाची नसते लोलिंगता !

देखतांच तशि घमघमणारी सामोरी सुंदरी
फणा पूर्ण पसरून उभा तो झाला पुच्छावरी
आणि तिला बिलगला लपेटा घालुन बसला सदा
बिळहि मिळे आयतें, देइं तळ, पळ न विसंबे कदा
गणी जरी त्याजला दिवाणी दुनिया पापी, खुनी
आन प्रेमिकाहुनी अणु न तो उणा प्रियाराधनीं !

वैशाखीं उद्दंड, चंड मार्तंड नभीं तळपतां
छत्र फड्याचें धरी उचलुनी तिच्या शिरीं तो स्वतां
भाद्रपदीं वरिवरी वरसतां सरीमागुनी सरी
कायेची कांबळी आपुल्या घाली तो तिजवरी
आणि मारगेसरीं कडकतां थंडी ' मी-मी ' अशी
रात्र असो ! दिन असो !! पडे तो तिजला कवळुन कुशीं !

असे वृत्ति जात्याच तयाची रंगेली, लंपटी
वेषाची आपुल्या सदा तो परिपाठी पालटी
कळे त्यास संगीत, मर्म ये नृत्यांतिल जाणतां
माथा तो डोलवी गुंगुनी पुंगीरव ऐकतां
त्यास असे आवडी विलक्षण विचित्र सौगंधिकीं
पुरवी ती तेव्हढी आघवी एकटीच केतकी

ती त्याला, तो तिला जिवाहुन पलीकडे मानती
वनवेली, तरुलता तयांची प्रीति अती वानती
जनदृष्टीनें परी ठरे तो कायमचा घातकी
आणि दिसे अडकली फशीं जणुं ती पतिता पातकी
तरिच दया दाविती तरुणि तिज गणुन शिरोभूषण
हो न तिच्याविण सांग मोहिनी आणि शेषपूजन.

दिन गेले, लोटले मास, उलटलीं पुढें वत्सरें
काळ आणखी किती निघावा रासविलासीं बरें ?
तपुन तपुन जाहली एकदां निदाघांत काहली
चुकुन म्हणुन चालला हवा तो सेवाया मोकळी
आणि तिच्यापासुनी असा तो असतांना एकला
एकाएकी सुटुन वावटळ गगनभाग झाकला

वृक्षांच्या घर्षणीं घोर अति दावाग्नी पेटला
डोंब तयाचा उंच उफाळुन गगनाला भेटला
उन्मळुनी उलथले मोडले वृक्ष उभे कडकडा
पानांपानांमधुन लागल्या ठिणग्या उडुं तडतडा
लक्ष जिभा हलवीत आपल्या ळळलळत्या भोंवतीं
वाट पुढें काढीत चालला हव्यवाट द्रुतगती

फुंफाटत काननीं तयानें प्रलय असा मांडला
लोट धुराचा नाकीं कानीं पक्ष्यांच्या कोंडला
जाळपोळ होतांच तयांचा माजे कोलाहल
हिंस्र पशू गर्जती भयंकर आर्तरवें विव्हल

खाक जळुन जाहली केतकी त्यांत रांखरांगुळी
उरला नाहीं अस्थींचाही मागमूस भूतळीं

अंतर्वैरी सखा तिचा तिथ त्यापुढतीं पातला
माती घालुन मुखीं गडबडा लोळाया लागला
भस्म जणूं अंगास चर्चुनी बैरागी तो बने !
अथवा रक्षा तिची वाहुनी तो गंगेलागिं ने !!
त्यजित उष्ण निश्वास घडिंघडिं फुत्कारत आननीं
विरही तो वणवणा भटकतो विजनीं तेव्हांपुनी.

नागपूर, १३.६.३४

## .१५. प्रणयप्रलाप

[ मी नवबाला

यापुढतीं हा जीव - जिवलगे !
रासविलासां अगदीं उबगे !
    आजवरी मी मधुमय मुरली
    अधराशीं या होती धरिली

पिचली परि ती   गळ्यांत पुरती
नीरव धमनी ही मज नलगे !
    विविध उमटले सूर हिच्यांतुनि
    समरसले ते वातावरणीं

श्रुतिरंध्रांतुनि   घुमुनी अजुनी
व्याकुल करिती भाव उगिच - गे !
    प्रीतिस न रुचे कृत्रिम रंजन
    वा उन्मादक वंचित जीवन,

चिर जें तेवें   तेज तिज हवें
अक्षय उजळी तें जग अवघें !
    प्रणय असे परि हा क्षणभंगुर
    सदय उगमिं तरि विलयीं निष्ठुर

फूल फुलें जें   तें कोमेजें
सृष्टिनियम हा काय न उमगे ?

नागपूर, २८.९.३४

# .१६. कलहान्तरिता

[ सोहनी

बोलुं नका मजसि प्रिया !
जा ! सखिसह विहराया

मजहुन जर तीच रुचे
तिजविण नच कांहि सुचे
मधुर तिचीं गमति वचें
द्या तिजला तर हृदया

अरविंदीं रात - भ्रमरी
अविरत मधु गान करी
वितरुनि निज कान्ति परी
मुग्ध उषा भुलवि तया

पुनवेचा चान्द हसे
न्हाणिरसा रौप्य रसें
शयनीं मज होय कसें –
केवि कथूं तें ? सदया !

नागपूर, २८.१०.३४

## .१७. त्यागी उपेक्षिता

[ किती गोड बाइ ! बाळ जसें

सहज केंवि विस्मरसी प्रियतमा ! मला ?
कुलिशकठिन होसि कसा ? कुसुमकोमला !

करकंकत गुंतवून कुरल कुंतलीं
नजरेवर नजर स्थिर करिसि आपुली
माझें मज देहभान राहिना मुळीं
ओंवाळी तुजवरुनी जीव मी खुळा.

हृदयीं मम फूल विमल प्रीतिचें फुलें
टाकि करुनि वृत्ति वृत्ति धुंद परिमलें
वायुपरी तूंहि परी ! हिरुनी तो बलें,
कुस्करुनी डावलिसी मृदु दला दला.

लहरीसम तुज लहरी मानुं कां तरी ?
गार तुझें हृदय गणूं कीं हिंवापरी ?
अथवा ये मळभ तुझ्या लोचनांवरी ?
हाय ! म्हणूं काय तरी चंचला ! तुला ?

आनंदें नांद तुझ्या नववधूसवें
भोगा उपभोग्ययोग्य जें नवें नवें,
लाभो तुज सौख्य सख्या ! हेंच मज हवें,
विसर मला ! छाया परि त्यजि न मानुला !

नागपूर, १.११.३४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 08C2

# .१८. बघ ! बालविभाकर ये उदया

[तोटक व दोहा

बघ ! बालविभाकर ये उदया
तम जाय हळूहळु हें विलया.
अतुल तूलिका घेउनी निज किरणांची काय –
कौशल्यानें रंगवी तो प्राचीचा काय ?
मयही न करी असली किमया !
स्वर्ण कुसुंभारुण छटा तिच्या मुखीं उमटून –
पिकापिकावर कोवळें फाके निर्मळ ऊन !
तरि नीज तुझी कशि हो न ? प्रिया !
गगनविहारी पाखरें उंच गळे ओतीत
वातावरणीं वरसती मोदक मंगल गीत
लवलेश नसे खळखंड तया !
तरुकरपल्लव 'या' अशी करिती खूण डुलून,
मंद मंद हसती फुलें माना वर उचलून,
विलसे वसुधा शुभशांतिमया.

नागपूर, १.११.३४

१२९९
स्थळ प्रत



# .१९. जो जो जो कलिके !

जो जो जो कलिके !
लतिकेच्या मृदु मंदांदोलीं
अर्ध्या उघड्या मिटल्या डोळीं,
राजसवाणें हासत गालीं
घे घे घे झोके.

सायंरविच्या सुवर्णकिरणीं
निळ्या सांवळ्या वातावरणीं
मूकभावना मनीं लपवुनी
डोल डोल सुमुखे !

नभोवितानीं चटक चांदण्या
निशामाइनें तुला खेळण्या-
जणों टांगल्या अगणित चिमण्या
खेळ खेळ कुतुकें.

खुशाल कर बा गाई गाई
गोड गळ्यावर ही वनराई-
गाइल छकुले ! तुज अंगाई
नीज नीज हरिखें.

नागपूर, ११.३.३५

## .२०. मूर्तिमती पूर्णिमा

[ भीमपलास

देखिलें तुज न जों स्नेहसंमीलनीं
बिंब तव बिंबलें तोंच या लोचनीं !

गोल गोरा तुझा
चेहरा हासरा
भासला साजिरा पूर्णचंद्राहुनी

कौशलें विरचिल्या
मृदुल घनकुंतलीं
वाटलें गुंतली श्यामला यामिनी

बघुनि गजऱ्यांतल्या
उमलणाऱ्या कळ्या
कल्पिलें - चमकते चांदणी चांदणी

वसन हलकें निळें
कांहिसें पांढरें
गगनगंगेहुनी विमल गमलें मनीं

रम्य अति साम्य हें —
पाहुनी संभ्रमें
मानिलें पूर्णिमा तुजसि तनुधारिणी

नागपूर, १६.३.३५

## .२१. डोळे हे सखि !

[ दुर्गा

डोळे हे सखि ! आळसलेले
काय निशेचे प्याले प्याले ?

रंग तयांचा आधिंच मादक
त्यांत पडे वर भर ही आणिक
झलभडक कां तेजोगोळक –
म्हणुनी झाले ?

विहगाच्या शुभ मधुमधुर वचीं –
काय जागली अरुणप्राची –
उघडझांप करि निज नयनांची
ती लडिवाळें ?

अर्धोन्मीलित गुलाबकोरक
मनास गमती सदैव मोहक
काय तयांचे युगल अचानक –
येथें फुलले ?

कांति तयांची अगाध सुंदर
भुरळ अनावर घालि मनावर
वशीभूत ती करि मज सत्वर
फेकुन जाळें !

अजमेर, ९.५.३५

# .२२. लावि विलंब न

[ मालकंस

क्षणहि अतां सखि ! लावि विलंब न
प्रणयनता मज दे अवलंबन !

प्रतिपदुपरिं जशि श्यामल रजनी
नील रुचिर चिर धारण करुनी
प्रकटे हळुहळु मृदु विधुकिरणीं
तूंहि मजशि तशि दे शुभदर्शन.

लाजत लाजत नव वनवेली
मुरड घालुनी तरुला कवळी
अवलोकुन ती मज तुजजवळीं
सुचवि तुजशिं जणु, दे आलिंगन ;

अगति जिला लव अवगत नाहीं
चपलचरण ती ही सरिताही
धावत कशि बघ ! शतवदनांहीं –
सागरास दे मधुमधु चुंबन.

सहज परस्परिं प्रकाश छाया –
जाति मिसळुनी सायंसमयां
जीवांचेंही उभयांच्या या –
होउं सुखद दे चिरसंमीलन.

नागपूर, १२.६.३५

# .२३. शुभमंगल दिन

[ आनंदभैरवी

आज उगवला शुभमंगल दिन
झालें कुसुमित मुकुलित जीवन !
विमल निरागस तुझ्या लोचनीं –
स्थिरावले मम चंचल लोचन !
विरघळले मम श्रवणसंपुटीं –
तुझेच मधुरे ! मधुमधुर स्वन !
संतोषित तव निःश्वसितांसह –
निःश्वसितें मम गेलीं मिसळुन !
न कळत कळलें मनास माझ्या –
तुझ्या मनाचें सुखसंवेदन !

नागपूर, ५.७.३५

# .२४. निद्रावश रमणी

[ दिंडी

जसें शोभे आकाश तें निरभ्र
तशी चादर ही शेजिं तुझ्या शुभ्र,
निजे त्यावरती तारका निवांत
तशी इजवरती तूं सुकांत शांत,

मेघ पिंगल ती पांघरून घेई
तुझ्या अर्धांगीं शाल त्यापरी ही ;
श्याम विजनश्री होइ दंवे आर्द्रा
स्वेदबिंदूनीं तेंवि तुझी मुद्रा

सुटे गुलछबुचा तरल विरल गंध
तुझीं निःश्वसितें तेंविं मंद मंद ;
जसें गंगेचें वीचिविकल नीर
तसा खालीवर होइ तुझा उर.

नागपूर, १६.७.३५

# .२५. माझी प्रिया सावळी !

[ सखे ! मी मुरारी

मला मोहि माझी प्रिया सांवळी !
तिचें सर्व कांहीं निराळें मुळीं !!
तिच्या शांत शालीन शीलामुळें
तिची अंगकांती विशेषें खुले
जशी शोभते झांक कृष्णाजलीं !
बसे स्निग्ध सारल्य तद्वर्तनीं
असे आणि साधीसुधी राहणी
गुणांचाच या वास दूर्वादलीं !
तिच्या मार्दवाशीं कराया तुला
अपात्रा अयोग्या गमे उत्पला
तयासारखें तेंच पृथ्वीतलीं !
वसे माधुरी जी तिच्या भाषणीं
नसे ती अलींच्या तशी गुंजनीं
तशी ती नसे शाहळीं, मोहळीं !
श्रमें तापल्या मन्मनोभूवरी
सदा वर्षवी ती सुखांच्या सरी
जशी श्रावणांतील मेघावली !
तिचें भावसौंदर्य वानूं कसें
तयानेंच लावी मला ती पिसें
जशी यामिनी शुक्लपक्षांतली !

चांदा, १७.८.३५

# .२६. कां इतुका थरकांप

[ एक दिन जानारे !

दीपका ! कां इतुका थरकांप ?

कां इतुकी ही तडफड फडफड ?
कां इतुका हा ताप ?
विकास पावत विझेल ज्योती
अखेर आपोआप !

चराचरीं चिरभरुनी उरला
वायूचा हा व्याप
यासह झुंजत तगणें जगणें
यांतच सर्व प्रताप !

स्नेहशील तूं सुखें करावा
उलट तयासह लाप
गमेल जीवन उदास नीरस
बसलें जर चुपचाप !

स्नेहासाठीं यज्ञ जयाचा
त्यास कुणाचा शाप ?
अजरामर तो दिव्य हुतात्मा
निष्कलंक निष्पाप !

नागपूर, १७.१०.३५

## .२७. कुढ्या जीवास –

[ पतितपावन नाम ऐकुनी - प्रमाणें

हृदयाच्या घरट्यांत उबविसी दुःखाचें अंडें —
कुढत कां रात्रंदिन ? वेडे !
लुळें पांगळें क्षीण पाखरूं जन्मुन काय ! – गडे !
कसें तें ओलांडील कडे ?

मेंदूच्या आळ्यांत रुजविसी बीं संकोचाचें —
सदा कां रडतखडत वाचें ?
किडकें सडकें खुरट रोप कां कांहीं कामाचें !
कसें तें फळेल गरकवचें ?

छातीच्या खोलींत भीतिचा खणसी पायंडा
खचत कां रचसी वर वाडा ?
जेमतेम जम धरुनी भिंती, खालुन त्यास तडा,
कसा तो राहिला ताठ खडा ?

नागपूर, २.११.३५

## .२८. उजाड माळ

[ रासमंडळी गोपीचंदन प्रमाणें - कांहींशी

उदास सायंकाल सुनें सुनें मंत्रताल
शेवटच्या किरणांत मावळे उजाड उघडा माळ;
कांहीं कळकट गोल, तर कांहीं बेडौल –
जिकडे तिकडे खूप पसरले ओबड धोबड टोळ.
बेलगाम वारें यावरुनी भिरभिरें
त्यामुळें वाळकें खुरट गवत मुरमुरें;
झाडाचें ना नांव, झुडुपांचाहि अभाव,
झुळझुळणाऱ्या ओढयाचाही नाहीं कोठें ठाव !

ऊन तपें तडकून, मेह पडे धडकून,
दाट धुक्यांतिल थरथरणारें हींव सुटे कडकून;
वर आभाळ अफाट, खालीं बरड सपाट –
कुठें मदारीपरी उंच, तर कुठें उथळ, खोलाट;
येथें न कधींही फिरके चिटपाखरूं,
नच चुकलें मुकलें भटके अथवा गुरूं
जंतूजीव विखार फिरती येथें फार,
वा एकादा वेडा बगडा वणवणतो लाचार !

नागपूर, ४.११.३५

# .२९. प्रेम व व्यवहार

[ सुनीत

नाहीं ना जडलें पिसें तुज ? अरे चंद्रा कलानायका !
पृथ्वीलागिं प्रदक्षिणा करित या कां राहसी सारखा ?
आराधून तिला असें तुजसि हो कांहींतरी लाभ का ?
प्रेमा तूं करिसी तिच्यावर परी तीतें गमे तो फुका !

मागोमाग तिच्या असें भटकुनी होईल का प्राप्त ती ?
घेसी आपण आपुली करुन तूं आशानिराशा किती ?
आशेनें उजळें तुझें मुख दिसें तेव्हां किती चांगलें !
भासें तेंच किती उदास उतरें जेव्हां निराशेमुळें ! !

प्रेमाचें तव मोल ना तिजसि, ती सूर्यासभोंती फिरे,
राहे निश्चल तो, तरी उलट ती पायीं तयाच्या झुरे,
वेडा तूं पुरता खरोखर, तशी तीही, नसे संशय ;
दोघेंही चुकतां ; कशास नसता लावून घेतां क्षय ?

जें कांहीं व्यवहार्य तेंच जगिं या मान्यत्व पावें यशें !
प्रेमाला कविकल्पनेविण खुळ्या ! अन्यत्र थारा नसे ! !

नागपूर, १.४.३६

## .३०. परित्यक्ता

[ तुझ्या बालमुकुंदें

मजपरी खरोखरि कमनशिबी कुणि नसे !
तिळभरी मुळीं सुख धरातळीं मज नच कोठें दिसें ! !
मजहून कुमारी कितीतरी या सुखी
दु:खाची यांना तिरीपही नाहिं कीं
फुललेली यांची कळी सदा सारखी
किति अजाण आणिक निर्मळ या मानसें !

या नटती थटती सधवा नानापरी
तें बघुनी भडके आग उगिच या उरीं
सौभाग्य तयांचें कुभाग्य माझें परी
मम मत्सरमतिला सुचे न कांहीं कसें !

मजपेक्षां विधवा पुण्यवंत फार या
या अनाथ म्हणुनी जगास यांची दया,
पति असुनी पतिता मी ; मज मी , तो तया ;
घर भकास भंवतें खाया धावें जसें !

हा चिकटे भाळीं विटाळ म्हणुनी टिळा,
मणिमंगलसूत्रीं ये अवघडुनी गळा,
करिं वृथा चुडे हे खुळखुळती खळखळा,
हीं लेणींलुगडीं सणासुदीला विषें !

मी कुमारिका कीं कोण न ये सांगतां
ना विवाहिता वा मी ना अविवाहिता,

मी असुनी सधवा विधवेसम सर्वथा,
गति कर्माची ही करि जन्माचें हसें !

संसार असुनही मज नसल्यासारखा,
जिव असुनी होई कुडिलागीं पारखा,
या अशा जिण्याहुन मरण बरें नाहिं का ?
मुळिं कळे न मन हें कवण्या मोहीं फसें !

नागपूर, २१.४.३६

## .३१. चारुचंद्रिके ! –

[ लाज मेरी आज हरी

ठेव झुलत सागरास चारुचंद्रिके !
उसळूं दे उंच उंच घ्यावया मुके.
विलसे नभ विमल नील
त्यावर तूं शांतिशील —
हसत राहसी, तशीच राहि गे ! सुखें.

उत्कंठित तो असाच
नाचतसे विविध नाच
बघत रहा ते खुशाल तूंहि कौतुकें.

गुंफुन निज किरणजाल
घाल तया प्रेममाळ,
उधळूं दे तुजवरती त्यास मौक्तिकें.

रिझवाया सतत तूज
प्रकट ज्यांत सकल गूज —
गाऊं दे त्यास अशीं गोड गीतकें.

नागपूर, २४.४.३६

## .३२. टाकुन मज जासि कुठें ?

[ सोहनी

टाकुन मज जासि कुठें ?
दीनेचा तूं दयाळ ? –
काळिज तव उरफाटें !

फुलला माझा गुलाब
घडला तुज थोर लाभ !
खुडुनी दलभार; खुपत –
ठेविलेस तूं कांटे !

फळला ज्या घडिस वृक्ष
झाला तुज तोच लक्ष्य !
वठतां तो त्यजुन त्यास
लागलास तूं वाटें !

पूर्वीं जें प्रेमपत्र
गमलें तुज भावचित्र
फाडुन तें सहज आज
उडविलेस तूं कपटे !

हातीं धरिलास हात
चरणें फिरलास सात
वेदिवरिल अग्निपुढिल
लग्नगांठ काय तुटे ?

भयदायक वादळांत
लोटुन तारूं जळांत !
सोडुन मज एकटीस –
चाललास बोल ! कुठें ?

मारुन मज मरणाविण
पेटवून सरणाविण
डावलून प्राण; शरिर –
नेसि असें कां उलटें ?

नागपूर, १३.६.३६

## ३३. प्रतिमा

[ हरिणी

सवड मिळते जेव्हां जेव्हां मला लवही गडे !
बघत बसतों तेव्हां तेव्हां तुझ्या प्रतिमेकडे
मग दिवस तो आहे, आहे सखे ! अथवा निशा
मज न शिवतो या गोष्टीचा विचारच तो कसा !

परि प्रिय अशा त्या चित्राच्या निरंतर दर्शनीं
अमित लहरी भावोद्रेकीं उचंबळती मनीं
अविरत अहा ! त्यांच्या पृष्ठीं तरंगत राहि मी
तशिच रुचते काव्यात्म्याला मला स्थिति नेहमीं.

नयनयुगलीं माझ्या बिंबे हुबेहुब मूर्ति ती
नजर विचरे जेथें तेथें दिसे तिज तीच ती ;
बघुन नुसती छाया होई दशा जर ही अशी
तर मग कळे ना ती व्हावी समक्ष तुझ्या कशी ?

दिसशिल मला जेव्हां माझ्यासमोर उभी – गडे !
अचल नयनें लावोनी मी बसेन तुझ्याकडे
मग मज मुळीं चित्राची ना उरेल प्रिये ! स्मृती
तुजच उलटी चित्राऐशी दिसेल मदाकृती.

चांदा व नागपूर, १९३५–३७

## .३४. वर्गवैषम्य

[ कणिका

राजा ! तव एका हातीं आहे सत्ता,
अन् दुसऱ्या हातीं आहे अगणित मत्ता
जोरावर यांच्या खुशाल तूं बिनधोक –
गरिबांच्या पाठिंत हाण तडातड लत्ता.

धनिका ! तव आहे पैशावर स्वामित्व
विद्वान आपुलें विकती तुज विद्वत्व
श्रीसरस्वतींचा अपूर्व संगम असला –
मजुरांना जीवन शोषुन करि निःसत्व.

तूं पांढरपेशा ! अससी अति मतिमान
म्हणुनीच मिळे तुज धनिकांकडुनी मान
त्यामुळेंच होउन गर्वोद्धत तूं सहसा –
मुरडाया बघसी दीनजनांची मान.

तूं आणि हमाला ! जन्मापासुन कष्टी
नच पैसाअडका कांहींच तुझ्या गांठीं
नच विद्येचेंही दर्शन होई तुजला
रे ! कष्ट तुझ्यास्तव अन् तूं कष्टांसाठीं ! !

अन् देवा ! तूं – तूं अससी सर्वश्रेष्ठ
तूं सत्तामत्ताविद्वत्तांत विशिष्ट
परि तुला तरी का आहे अनुभव ? सांग –
की, हीनजनांचे किती कोणते कष्ट.

नागपूर, ११.९.३७

## .३५. तुझें चलनवलन

[ बीति जात उमरवा ए

खचित तुझें चलनवलन चपल चारुगात्री !
चपलेहुन अधिक तरल चमक झमक नेत्रीं.
अधर मधुर लाल लाल,
नव गुलाब गौर गाल,
लवचिकपण कटिंत जरा काय तेंवि वेत्रीं !

नागपूर, १. १०.३७

## .३६. अपत्यसंभव

[ हरिणी

हळुहळु सरे मागें मागें अधोमुख यामिनी
दिन तिज करीं आकर्षोनी रमे परिरंभणीं
सुखकर खरा संधी त्यांचा न हो क्षण जों असा –
हसितवदना तों आरक्ता अहा ! प्रकटे उषा.

लगबग किती वेगें वेगें अधीर नदी निघे
अमितवदनीं चुंबायातें पयोनिधितें बघे
रतिफल किती शोभादायी तदीय दिसे, पहा,
शुभ त्रिभुजभू ही स्निग्धार्द्रा उदार महा अहा !

प्रणयसरसीं जीवेंभावें सदैव तरंगत
प्रथमऋतुशीं होई वेली वनीं चिरसंगत
मधुमय किती तत्प्रीतीचा पहा परिपाक हा
रुचिर कलिका ही स्वच्छंदी कशी विकसे अहा !

सर प्रथम तूं त्वत्स्नेहाचा दिलास सखे ! मला
मग उलट मी मत्प्रेमाचा दिला सर हा तुला
पुनरपि तुझा तूं, मी माझा, अनुक्रमिं या पण
सहज किति ही झाली त्यांची अहा ! मृदु गुंफण.

नागपूर, २८.२.३८

# .३७. तुला न ओळखलें

[ बघुन मेनकेला

तुला न ओळखलें सागरा ! तुला न ओळखलें
वरवर केवळ तुला निरखिलें हें माझें चुकलें
अमर्याद म्हटलें तुला मी अमर्याद म्हटलें
तुझ्यापरी मर्यादशील परि कुणी न, हें पटलें;
गंभीर खरोखर अससी तूं अंतरीं
आंतल्या गांठिचा गणिलें तुजला परी
तुला न पारखिलें आंतुनी तुला न पारखिलें
वरवर केवळ तुला निरखिलें हेंच मुळीं चुकलें.
खळबळ खळबळ ही जीवनीं खळबळ खळबळ ही
परी अंतरीं शांत खरोखरि तुजपरि कुणि नाहीं
तूं उदार,– उदरीं सरितांना लाविसी,
अंबरीं कलानिधि हसतां हेलावसी
कलाप्रीति विमला तुझी ही कलाप्रीति विमला
वरवर केवळ तुला निरखिलें; ओळखलें न तुला.
बघुनी क्षारजला तुझ्या या बघुनी क्षारजला
क्षुद्रबुद्धिनें तिरस्कारिलें क्षणोक्षणीं तुजला
सहकंपभाव परि उरीं तुझ्या दाटला
तो जलरूपें या आहे कीं प्रकटला !
हृदयिं रत्नराशी सांठला हृदयिं रत्नराशी
वरवर केवळ तुज बघतां, तो गवसला न मजशीं.

नागपूर, १९.३.३८

# .३८. प्रणयप्रभात

[ विरति सकल मतभेद

उघड उघड निज रम्य नेत्रपद्म प्रियतम !
जाग जाग बघ ! तिळ पुरलें तम
कसुन कटीला कांचनकांची
अरुणावरणा प्रसन्न प्राची
हसत हसितमुखि मंद मंद येत गजगम
प्रतिपळिं उडुउडु होत अगोचर,
होत कांतिगत प्रतिपळिं शशिकर,
चपलचरण करि गंधवाह नृत्य अनुपम
विहरत गगनीं गाति विहंगम
गीत तयांचें नव हृदयंगम
सलिललहरिगण त्यास ताल देत रुमझुम
लतेलतेवर फुलें विकसती
चमचम हिमकण त्यांत विलसती ;
करिं धरि मणिमय पुष्पपात्र काय द्रुम द्रुम !
रविकररंजित मेघ धावती,
धवलित होती दिशा भोंवती
पसरत हळुहळु तेज दिव्य किंतु उपशम
मी रजनी तव तर तूं दिन मम
उभय परस्परिं समरसुं त्यांसम
चल करुं जयजयकार, पूजुं, ध्याउं रतिरम

नागपूर, १२.५.३८

# .३९. विरंगुळा

[ चंद्रकांत

नील जलाशय त्यावरि कतिपय
उठती तरल तरंग
उठती – फुटती फुटती – उठती
क्रम हा एक अभंग

संथ त्यावरी दोन पांढरीं
पाणकोंबडीं दंग
इकडुनि तिकडे तिकडुनि इकडे
तिरती फिरति अभंग

सभोंवतालें सांज मावळे
विखुरित श्यामल रंग
खालीं – वरतीं वरीं – खालतीं
श्यामलताच अभंग

वाहे झुळुझुळु वारा हळुहळु
स्पर्शित आंतुन अंग
शांतिसुखाचा एकच साचा
अनुभव देत अभंग

नागपूर, १५.५.३८

# .४०. कसें धरावें तुज हातीं ?

[ कांहींशी ' पतितपावन नाम ' प्रमाणें

प्रदीप्त दीपा ! तुझीं फांकतीं
प्रकाशकिरणें सभोंवती
कशीं धरावीं तीं हातीं ?

मुखरित वीणे ! तुझे नादती
निनाद मंजुळ सभोंवती
कसे धरावे ते हातीं ?

प्रफुल्ल सुमना ! तुझा दरवळे
सुगंध सुखकर सभोंवती
कसा धरावा तो हातीं ?

रसाळ आम्रा ! तुझ्या अंतरीं
वसे मधुरिमा सुरस अती
कसा धरावा तो हातीं ?

चंचल अनिला ! तुझ्या वाहती
कोमल लहरी सभोंवती
कशा धराव्या त्या हाती ?

जगन्निवासा ! अलक्ष स्वांतीं
निवास करिसी निराकृती
कसें धरावें तुज हातीं ?

नागपूर, ५.९.३८

## .४१. –तूंच !

[ जीवनपुरी

ओतिलेस तूंच तदा
जीवनांत संजीवन,
जीवाच्या रानीं तूं
फुलविलेस नंदनवन;
नांदुनि सानंद तूंच
वसविलेस शून्य सदन
स्नेहानें उजाळिलेस
मावळते कांतिकिरण.

तूं तुटल्या तारांतुन
काढिलेस स्वरतरंग,
विटल्या चित्रांत तूंच
उज्ज्वल भरिलेस रंग.

तूं माझा जीवप्राण,
हृदयच माझें द्वितीय,
शुभ सस्मित चंद्रिकाच
चित्ताची तूं मदीय.

नागपूर, १७.१०.३८

## .४२. पुरापासून दूर –

[ सुनीत

जाऊं दूर चला ! पुराजवळुनी रानीं कुठें बाजुला
चित्ताला न करील विस्मित जिथें पुंजीपतींचें यश,
कर्णी या पडतील ना गिरणिचे कर्णे जिथें कर्कश
डोळ्यांना न दिसेल धूर अथवा जेथें धुराड्यांतला.

जाळाया निज पोट काम करुनी सोळा कलाकांवर --
जीवात्मे नसतील राबत जिथें निर्जीव यंत्रांपरी,
कुर्घोडी नसतील ताणत जिथें श्रीमंत दीनांवरी,
झालें द्रव्य नसेल केंद्रित जिथें एका स्थलीं वा स्थिर.

सत्ता आणिक संपदा उभयतां एकत्रुनी भैरव --
धिंगाणा नसतील घालत जिथें बेफाम रात्रंदिनीं,
जेथें पृथ्वि नसेल स्वर्ग बनली श्रीमान लोकांस्तव
झाली आणि नसेल ती नरकही निष्कांचनांकारणीं.

तेथें जाउं चला ! पुरा त्यजुनियां धावा करा या त्वरा
पृथ्वी पृथ्विच ठेवुं आणि बनवूं स्वर्गाहुनी सुंदरा.

नागपूर, १९.२.३९.

पुंजीपती – भांडवलवाले.

कलाक -- तास, घटिका.

## .४३. सहसंचार

[ चाल — कधिं भेटेल मजला देव हरी

चल, दूर कुठें तरि जाउं कसें
करुं सहल अंमळ — जंव ऊन नसे.

शुक्राची ही चटक चांदणी
झळझळ झळझळ झळके गगनीं
दीप तेवतो काय नंदनीं !
लव उजेड लव काळोख असे.

जागोजागीं ढग आळसले
दूर नगावर धुकें पांगलें
कलकल करती बदकें, बगळे,
आरवे कोंबडें — शिंग जसें !

एकसारखें गुंजत निजगुज
कुंजाशीं करि वायू कुजबुज
अनुभव याचा नाहीं का तुज ?
हें बघुन फुलवरा गोड हसे.

झिंगत झिंगत उधळे परिमळ
हृदय करी हें आंतच चुळबुळ
करांत गुंफुन कर, मजसह चल —
सुखशांति जिथें निश्चिंत वसे.

नागपूर, १५.३.३९

## .४४. घराकडे परततांना—

[ बागेसरी

अंधार ! अंधार ! !
पडला सभोंवार !

घर दूर !
मी दूर ! !
पल्ला मधें फार !

थांबून हा वेळ
मजसाठीं असतील –
झाले उतावीळ –
डोळे घरीं चार !

भटके दुरीं देह,
मन टेहळी गेह –
गोंवी तया मोह
निजपाशिं अरुवार.

गृह - सौख्यसाम्राज्य !
गृह - मूर्त स्वाराज्य !
त्यावांचुनी त्याज्य –
हा विश्वसंसार !

नागपूर, १९.९.३९

अरुवार – नाजुक; स्वाराज्य – स्वर्गाचें राज्य.

## .४५. हास हास तारे !

[ उघडि नयन रम्य उषा–प्रमाणें

हास हास तारे !
हसत राहुनी अशीच हसव विश्व सारें.

नयनीं तव तरल तेज,
वदनीं मधु मुग्ध लाज,
थरथरथर
अधरावर —
कांपरें थरारे.

शीतल तव सुप्रकाश
वसुधेवर सावकाश
झिमझिमझिम
झिमझिमझिम
वर्षवी फवारे.

उजळित तव भोंवताल
किरणांचें मृदुल जाल
गिरिगिरिवर
तरुतरुवर
घेइ स्वैर फेरे.

धवलनील अंबरांत
रजतरुचिर तूं सुकांत

मराठी ... 0840

तुज ध्याया
उठती या
मानसीं मनोरे.
हससी तूं परि वरून
मीहि हसे तुज दुरून
जें सुंदर
जें ईश्वर
तें दुरीच थारे.

नागपूर, १९.९.३९

## .४६. क्रान्तिस्तोत्र

सं. नं. ..........
रथद्र [भूप

क्रान्तिदेवी ! तुझा उदय अक्षय असो !
सतत सर्वत्र तव जय असो ! जय असो ! !

कस्पटासम सदा लेखुनी संकटां
अढळ राहो तुझा तांबडा बावटा
फडफडो सारखा उंच तो एकटा
त्यावरी चिन्ह तव घणविळाद्वय वसो !

देखतां तुज पळो नीच परतंत्रता,
विलय पावो झणीं विषमुखी विषमता
आणि काळें करो राक्षसी शत्रुता;
राजकारण तुझें न्यायनयमय असो !

हीन – म्हणुनीच जे रंजले गांजले
दीन – म्हणुनीच जे पोळले भाजले
लीन – म्हणुनीच जे प्रगतण्या लाजले
सकल दलितांस त्या चिर तवाश्रय असो !

जन्म, कुल, रूढि हें सर्व कांहीं नुरो !
पूर्ण समभावना जीवमात्रीं भरो !
जो श्रमी, जो गुणी त्यास लक्ष्मी वरो !
मनुजजीवन सुखी, शांत निर्भय असो !

नागपूर, ५.१०.३९

# .४७. प्रेममंदिर

[ सुनीत

कोठें ती मुमुताज आज अथवा शाहेजहाँ तो कुठें ?
हें तत्स्मारक मात्र रम्य यमुनातीरीं नटे गोमटें ;
गेलीं प्रेमिक प्रेयसी उभयतां तीं मृत्युलोकांतुनी
त्यांचें शाश्वत प्रेम मूर्त परि हें आतां दिसे लोचनीं,

किंवा सुंदर स्वप्न हें नृपतिचें साकार आहे उभें,
कीं त्याचे विरहाश्रु रूप धरिती हें मर्वराचें नवें,
वा देई जगतास प्राप्त करुनी ऐश्वर्य तो हें महा,
सौंदर्यावरती सुरेख चढवी कीं ताज तो ताज हा.

'छे ! कांहीं न असें समाध परि ही त्याच्या प्रियेची असे
पैसा हौस म्हणून तो हिजवरी ओती पसेच्या पसे,
गांजी तो जनता तदर्थ, तिजला अन्याय्य लावी कर'
मूर्खांनों ! न करा उगाच भलती टीका अशी त्यावर;

बांधी ताजमहाल हा निज मृता कांतेवरी तो जरी
प्रेमाची अजरामर प्रकट ही प्राणप्रतिष्ठा तरी !

नागपूर, १.१.४०

मर्वर – स्फटिक ; ताज – मुकुट.

# .४८. आला पर्जन्यराज

[ देस

आला पर्जन्यराज
पुलकित तत्स्वागतार्थ आनंदें धरणि आज !

जलदाचा पायघोळ
अंगीं फर्गोल नील
गोट्याची —
कड त्याची
रौप्याचा रुचिर साज !

चपल धवल बगळ्यांची
कंबुकमाला गळ्यांत,
माथ्यावर
चमकदार
तडितेचा चटक ताज.

हृदय किती आर्द्र अमल !
जीवन जीवन यथार्थ ! !
चाले वर —
गगनिं स्वैर
याचें सुंदर जहाज !

धामणगांव ते चांदूरमध्यें आगगाडींत, ५.६.४०

फर्गोल — पायघोळ झगा, Gown ;
गोटा — रुपेरी जरतारी ; कंबुक — शंख ; ताज — मुकुट.

# .४९. जातिल जातिल निघुन हेहि दिन !

[ मालकंस

जातिल जातिल निघुन हेहि दिन
हो न उगिच तूं निराश हे मन !

अननुकूल जरि ग्रहगति संप्रति
टिकावयाची चिरकाल न ती,
आज रुसे जी उद्या हंसे ती –
सतत नियतिमधिं हो परिवर्तन

परिस्थितीचें बुजगबाहुलें
जरी वटारी डांबरडोळे
तूं न पाखरूं अजाण भोळें,
हरिणाचें तव उरिं काळीज न

जनन सुखाचें दुःखामधुनी
दुःख ठेविलें सुखामागुनी
क्षणीं ऊन क्षणिं पाउसपाणी
रे ! निज जीवन म्हणजे श्रावण !

दिसे कोळसा काळा वरिं वरिं
दडुनी राहे भूच्या उदरीं
परी तयाच्या सुप्त अंतरीं
दीप्त सदोदित गुप्त हुताशन

नागपूर, १४.६.४०

## .५०. आजच्या मानवतेस —

[ दासि ऐसें मानुनिया

धन्य धन्य मानवते ! हीच का तुझी प्रगती ?
हीच का सुरक्षितता, स्वस्थता तथा शांती ?
खाती फाडून आज मानव हे मानवांस
मानवते केंवि तुला ही तदीय घोर कृती ?

तूं स्वतंत्रता, समता, बंधुता त्रयीचा या —
देसी का हाच पाठ ? हीच का तुझी रीती ?
मानव कीं दानव हे ? भेद केंवि जाणावा ?
सगळेच्या सगळे हे धूर्त, घातकी, स्वार्थी !
'हें माझें, तें माझें, जगतीं माझेंच सकल; —
मी तारक, मी मारक' हीच संस्कृती, नीती !
भूमीवर, वारीवर संगरले आजवरी
केली आतां अपूर्व वायूवर विजयप्राप्ति.

वर्षविती अग्निगोल हे मानव वैमानिक
उन्नत कीं अवनत तूं ? तूं सुमती कीं कुमती ?
होती निष्प्राण पौर जे अजाण, जे अपाप
मांसाशन, रुधिरपात — केव्हां होणार तृप्ति ?
हो तुझ्या कलाकृतिची खाक, राखरांगोळी
आग लाविसी विभवा तूंच आपुल्या हातीं !
लोभ हा पुरे सत्तासंपदाप्रतिष्ठेचा !
शीक त्याग, त्यज हिंसा, अंगिकार सत्प्रीती !

नागपूर, १५.६.४०

## .५१. त्याग !

[ प्रणयप्रभा

कर हवन अगोदर प्राण तुझे,
मग मिळव पाहिजे तुज जें जें !

रुचे तुला जी विशिष्ट वस्तू –
प्राप्त व्हावि ती हा जर हेतू –
मोल तियेचें दे आधी तूं ;
व्यवहार शिकवि तरि काय दुजें ?

ऊठ, अगोदर वावर नांगर,
गाळ घाम, कर कष्ट निरंतर,
पेर हवें तुज बी जें नंतर –
उगवेल धान्य कण कण म्हणजे.

पहा जरा तर मेणबत्तिला,
जाळुन टाकी जीव आपुला –
मिळे अमरता म्हणुनी तिजला,
उजळाया तम ती पुन्हा सजे !

करुन समर्पण घन निज जीवन –
जीवांना दे नवीन जीवन;
मिळवुन मग तो अजरअमरपण –
बघ ! धीर गभीर पुन्हा गर्जे !

नागपूर, ३.७.४०

## .५२. तशी मुळीं मी नाहीं !

[ वाटलें नाथ हो !

तुम्हि जशी समजतां तशी मुळीं मी नाहीं !
कळतें मज सारें कांहीं ! !

तुम्हि प्रेम दावितां मजलागीं वरकरणी
परि मनांत तुमच्या दुजी कुणी प्रियकरणी
पुरुषांची तुम्हा ठाउक उलटी करणी –
मज पूर्वींपासूनच ही !

तुम्हि वेड पांघरुन पेडगांवला जातां
ओठांत एक पोटांत तुम्ही अन्यथा
तन देवळांत मन खेटरांत ठेवतां
जाणीव पुरी मज राही !

तुम्हि फूलपाखरूं फुलाफुलावर झुकतां
तुम्हि खुशालचेंडू स्वैरपणें भटकतां
चवढाळ चवी तुम्हि नव्या नव्या चाखतां
भय नाहीं ! लज्जा नाहीं ! !

मी किती विनवितें, काकुळतीला येतें,
मायेचें नाटक तुम्ही वठवितां नुसतें
मज कळतें पुरतें परि नच अगदीं वळतें
मी साधी भोळी बाई !

नागपूर, १५.८.४०

## ५३. प्रवाशास —

[ भैरवी

चाल रे ! प्रवासी
खांद्यावर टाक पडशि ;

अंथरूण पांघरूण
घे सारें आवरून,
उरक अशन,
धूम्रपान,
उचल डोलरश्शी.

हळुहळु हो लुप्त निशी,
सुप्रभात –
वात सुटत,
उगत सर्वसाक्षी.

रात्रीस्तव ही सराइ
हींत दिनीं कुणि न राहि
हींत सतत–
वास उचित–
नाहिं जागृतासी.

चिंताकुल बघसि काय ?
झपझपझप उचल पाय !
लांब इथुन
गांव अजुन –
निघसि तूं जयासी.

नागपूर, २३.१०.४०

## .५४. मनुजा! हास हास

[ जन पळभर म्हणातिल

मन करून मोकळें हास हास
कां इतुका मनुजा ! तूं उदास ?

भरला राहे चिखल भोंवती
कृमिकीटांची तयांत वसती
उरां लागती, गळां बिलगती
बघ ! कमल हसे तरि निरवकाश.

कधीं झोडपी वादळवारें,
कधीं पाखडी सूर्य निखारे,
कधी कुऱ्हाडी करती मारे,
बघ ! तरुचा द्विगुणित हो विकास.

सतत जाळली जाइ वर्तिका
होइ स्नेहनिधि रिता सारखा
अति अति उजळे परी दीपिका
बघ ! निबिड तमीं ती करि प्रकाश.

सहाणेवरी क्षणाक्षणानें
घटे झिजे तनु कणाकणानें
त्यजि न शैत्य, अधिकाधिक मानें –
बघ ! चंदन वितरी तरि सुवास.

जलद जलांतुन, जल जलदांतुन;
गृह मातींतुन, माति गृहांतुन;
रात्र दिनांतुन, दिन रात्रींतुन
बघ ! निसर्ग, कर निज भ्रमनिरास.

नागपूर, १७.१.४१

## .५५. कुठेंतरी दूर —

[ ललत

दूर कुठेंतरि जाणें गऽ
कुठें परंतू
तें मी वा तूं
उभयीं कोणि न जाणे गऽ

कोण, कोठलें –
आपण ? न कळे !
जुळलों अंतःकरणें गऽ

जितकें रुसलों,
तितकें हसलों,
वसलों जोंवर वसणें गऽ

प्रवाह दोघें
समरसलों गे !
कसें विलग मग होणें गऽ

नागपूर, २५.२.४१

## .५६. श्रमजीवी

[ एक तुतारी द्या मज

फुलो फळो तरु ही इच्छा तर
सिंच सिंच हीं मुळें निरंतर

मुळें बिचारीं पतित अधोगत !
चरणदलित हीं ! हीं पंकांकित !
पातालाच्या पोटीं संतत –
धुंडित फिरती ठाव ओलसर.

जिवंत तेथिल शोषुन जीवन
तरूस देतीं हीं संजीवन
जीवन तें तरु प्रोक्षुन प्रेषुन –
फुलांफळांचें पोषी अंतर.

फुलें, फळें, तरु चढती वरवर
कारण खाली मूळांचा थर
मुळांमुळें हीं अवघीं संदर
जगतीं जगती हीं मूळांवर.

मुळें जराही जर हीं किडलीं,
जराजर्जरित खुरटुन अडलीं,
तीव्र आतपीं सुकुनी झडलीं
फुलें, फळें, तरु मग कुठलीं तर ?

नागपूर, २५.३.४१

## .५७. वियोगिनी

[ प्रणयप्रभा

माहेर सोडुनी जाउं कशी ?
माझें न कुणी सासुरवासीं !
तिथें चेहरे अगदी नवखे
आपुलकीला पूर्ण पारखे
कोण त्यांतला मला ओळखे ?
जग भकास भंवतें परदेशी !
तिथें न जागृत नयनीं ज्योती
स्नेहशून्य तम अवतीभंवती
त्यांत कोण मज सगासोबती ?
की चकवी कुरळे कुरळुं तशी ?
तेथें हृदयीं फुटती न नद्या
उथळ कोरडीं पात्रें वाया !
क्वचित पल्वलीं फेसाळत त्या
जीवनांत जीवन मिसळुं कशी ?
मंद चेतना आतां गात्रीं
शरीर हें जणुं जिवंत छत्री !
प्राण राहती जागत नेत्रीं –
प्रिय दिसतिल आशा त्यांस अशी !

नागपूर, ३०.३.४१

कुरळणें – पक्ष्यांचें आर्त ओरडणें ; पल्वल – डबकें ; छत्री – समाधी.

## .५८. घराकडे—

[ मालकंस

समोर चमके सायंतारा
खुणवी नयनीं
तो मजलागुनि –
‘ घरास चल रे ! चल माघारा. ’

गुरें, पाखरें
परतती त्वरें,
जाय काजळत परिसर सारा.

धूमिल धूसर
अवघा परिसर
उजेड अगदी अंधुक अधुरा.

हळुहळु हळुहळु
झुळुझुळु झुळुझुळु
अवकाशांतुन नाचत वारा.

दूर पलिकडे
वसे गांवढें
कौलारांवर धूर पांढरा.

थांबे सारी
जनरहदारी
बैल मोकळे रिता खटारा.

या शुभ समयीं
उजळुन समई
असेल तिष्ठत दारीं दारा.

असतिल बाळें
लावुन डोळे
पहात माझी वाट भिरभिरा.

घरीं एकदा
पोचेन कदा
चुंबुन त्यांना लावीन उरां.

नागपूर, ५.४.४१

## .५९. कलिकुबेर

[एक तुतारी द्या मज

भाग्यवंत धनवान खरोखर
विभिन्न क्षेत्रीं हे अग्रेसर !

पिढ्यापिढ्यांच्या भांडवलावर,
यंत्रगृहांतिल कला–कळांवर,
श्रमजीव्यांच्या श्रमाबलावर
अनायास हे होती गब्बर !

हे व्यापारी उदमी खंदे
हे न कुणाचे गुलाम बंदे
घेती हातीं अवघे धंदे
स्वस्थ जीविका यांची त्यांवर.

यांच्यापाशीं अगणित मत्ता
जगांत यांच्या अफाट पेठा
संरक्षण दे यांना सत्ता
अगणित यांना लाभ निरंतर.

जशी जशी जन करिति मागणी
तशी तशी हे करिति पुरवणी
मिळेल तितकें घेति मिळवुनी
श्रमजीव्यांस पिळुन निशिंवासर.

सुखासीन हे भोगविलासी
त्याग, विराग न ठाउक यांसी
अधरीं मदिरा, उरिं मदिराक्षी,
द्यूत, शर्यती यांना प्रियकर.

भाग्यक्षण नच यांचे आतां
समतावादी उगवे सत्ता
जिरविल यांचा मद ती पुरता
स्वतंत्र, न्यायी, ती बलवत्तर.

नागपूर, १३.४.४१

## ६०. युगांतर

[ मालकंस

येवो ! येतो जवळ शिशिर जर,
नेवो ! नेतो वनवैभव वर;

शुष्क रुक्ष रसहीन तदंतर,
अहंभावमय आकुंचित उर,
हिमसम निर्मम क्रूर कठिन कर
शरीर कुशकृश भयकर जर्जर.

पिकुनी पानें पडोत पिवळीं
सुकुनी झुकुनी झडोत खालीं
मिळोत मातिस मातीमधलीं;
जीवन पुनरपि परि मरणोत्तर !

बनोत पुष्पें कोळ वाळुनी,
वठोत फांद्या जळुनी पोळुनि,
उभा सापळा तरु; तरि वळुनी –
पुनश्च येइल वासंतिक भर !

अवकाशांतिल हवा गारठो !
कणकण द्रवता खुशाल गोठो !
उठोत भडके ! वणवा पेटो !
जीर्णांतुन नव होइल गोचर !

नि:संशय जरि काल सनातन
नित्य त्यांत तरि हो परिवर्तन;
मघां पुरातन, आतां नूतन,
क्षणक्षणांतुन होइ युगांतर !

नागपूर, १७.४.४१

# .६१. आज

[ पोवाड्याप्रमाणें

होती आज हवाई हल्ले
विसरा विसरा आतां पहिले
सुरुंग, खंदक, किल्ले

अग्निगोल शिरिं आज वर्षती,
पाणबुड्या नौकांस कर्षती,
तरतीं टाकीं देश नाशिती,
लढती मोटरवाले.

असो राष्ट्र सागरवलयांकित,
असोत भंवतीं अभेद्य पर्वत,
असो चहुंकडे विस्तृत सैकत
यांचें कांहि न चाले.

आज नागरिक आणिक सैनिक
समजा अवघे पाइक, नाइक;
जीवित, वित्त, कलांचे भक्षक—
युद्ध आजचें सगळें.

दूर धनुष्यें, तोफा फेका,
तलवारींना स्पर्श करुं नका,
पडून गंजूं द्या बंदूका,
टाका बर्च्या-भाले.

विज्ञानें हो आज युगांतर
सत्ता, मत्ता, त्यावर निर्भर
त्यांस्तव मानव होइ जनावर
अघोर घाली घाले.

जगत आजचें प्रगत असें हें!
मानव बनला दानव आहे!!
देव तयांतिल कोठें राहे?—
तोच काय वा खवळे?

नागपूर, ३.५.४१

## .६२. संसारसंगीत

[ जीवनपुरी

वाजविते सहज कोण
        अंतरिंचें मूकयंत्र ?

या विलोल तंत्रींचें
        अवगत कोणास तंत्र ?

यांस कलाकुशलकरीं
        जुळवुन एका स्वरांत –

उमटविते यांच्यांतुन
        कोण मधुर मधुर मंत्र ?

या सुरेल संगीतीं
        लागे माझा समाधि

पुलके प्रत्यंग मुदें !
        उकले एकेक अंत्र ! !

नागपूर, १२.९.४१

तंत्र – तारा ; अंत्र – आंतडें.

## .६३. राजकवि तांबे यांस

[ तीरथ कौन फिरे

हे अजरामर रससिद्ध कवे !
तव गीतिकाव्य गा मुक्तरवें.

विमल निरामय तुझ्या मानसीं
मधुमेघांच्या उठती राशी
आणि अकल्पित क्षण संघर्षी –
ओसरती सहजासहजिं जवें !

रसाभिषिंचित, भावस्पर्शी,
रमणीयार्थक शाब्दिक वेषीं –
काव्य तुझें जनमन आकर्षी
तें अक्षय धन आम्हांस हवें !

सौंदर्यें तें अशेष रंजित,
माधुर्यें तें पूरित, पुलकित,
सौकुमार्य करि त्यालागिं ललित –
मग कां न सत्य, शिव तयासवें ?

ओसंडुन मधु ज्यांतुन वाहे –
मधुपांची मधुशाला आहे –
अनंत मधुमय 'सुमन' तुझें हें
चिरकाल रुचिर ! चिरकाल नवें

नागपूर, १४.१०.४१

## ६४. गृहसम्राट्

[ साकी

गृहसाम्राज्यावरी गाजवी हा अनियंत्रित सत्ता
लहान मोठे गोड मानुनी घेती याच्या लत्ता.

मध्ययुगांतिल जनहिततत्पर जणुं हा जुलुमी राजा
जुलुमापेक्षां प्रिय कृत्यांचा याच्या गाजावाजा.

अत्याचारी खरोखरी परि हा लोकप्रिय भारी
कारण उत्सुक भेटायाला यास माणसें सारीं.

सहज मजेनें ओढी हा निज धर्मगुरूची दाढी,
आजोबांना बनवी घोडी लगाम म्हणजे शेंडी,

हा आतेची वेणी सोडी भाईची करि खोडी,
अधुनी मधुनी बारिक सारिक ताईस चिमटे तोडी,

बघतां बघतां हा मामाचे उपटी दोन्ही कान,
मावशीस कडकडुनी चावी तिचा न ठेवी मान.

यास चालतां ये ना अथवा यास बोलतां ये ना
कुठलें लेखन ! कुठलें वाचन ! सारें कांहीं नन्ना !

पडल्या जागेवरुनी तरि हा आरडुनी दे आज्ञा
अवमानें ती मोडायाची असे कुणाची प्राज्ञा ?

नजरबंद हा करुनी ठेवी सदैव आईबाबां
मनें तयांचीं मुठींत याच्या त्यांवर याचा ताबा !

घरांतले जे जन ते अवघे गुलाम बंदे याचे
सेवेसाठीं मागें मागें याच्या जो तो नाचे

कुणी आंगडें, कुणी टोपडें यास लेववी मार्यी
कडे घेउनी इकडे तिकडे कोणी हिंडुन येई,

गालांचे तोंडाचे देउन गोड गोड हा पापे –
प्रजानुरंजन करी; कोण मग राज्यीं याच्या तापे ?

नागपूर, १८.१०.४१

## .६५. खेळव चिमणा माझा

[ क्षणभर नीरजनयना येना !

खेळव चिमणा माझा, चिमणे !
खेळव चिमणा माझा

रडे सोनुला केविलवाणें
गडे ! तुझें गा चिंवचिंव गाणें
हासव माझा कलिजा, चिमणे !

बांधिन पायीं तुझ्या घागऱ्या
मोत्यांच्या घालीन गळसऱ्या
रिझव लाडका राजा, चिमणे !

तुझ्या चोंचिला हिंगुळ लिंपिन
पंखांवरती केशर शिंपिन
सुखव चिमुकला जा,जा, चिमणे !

अंगणांत मी टाकिन दाणे
एक एक ते तूं टिपुनी ने
समजव छकुला माझा, चिमणे !

नागपूर, २७.१०.४१

हिंगुळ – पारा व गंधक यांचें रासायनिक मिश्रण.

स्थळ प्रत
[प्रणयप्रभा

## ६६. ओसाड घर

हे असे कसे भाडेवाले ?
टाकून मोकळें घर गेले !

आंत किती काळोख – रात्र कीं !
खिडक्यांतहि ना उजेड बाकी
नाद कड्यांचे मुखांतल्या मुखिं
बेपर्वा सगळेच्या सगळे !

दृष्टी टाका आतां आंत न
उदास भटके तिथें सुनेंपण
उजाड भेसुर अवकाशाविण —
आतां न कुणी तेथें उरले !

दारें अवघीं झाका झाका,
खिडक्यांवरती पडदे टाका
आंत कुणीही डोकावुं नका,
कीं काय काय तेथें चाले ;

हसूं नका ! करुं नका गलबला !
निमूट अगदीं पुढें व्हा ! चला !
नीट बघोनी घ्या हें डोळां –
घर मातीचें मातींत मिळे.

येथें भ्रष्टाकार मातला,
गोंधळ अत्याचारिं घातला,
दिव्य मंदिरीं झाले गोळा –
हे म्हणुनी का भाडेवाले ?

नागपूर, ८.२.४२

## .६७. नाजूक गुल्बशी

[. दशाक्षरी छंद, अक्षरें १।४।७ वर आघात

रुसली फुगली कां ग ! अशी–
साजूक नाजूक ही गुल्बशी ?

गालांचे गुलाब कोमेजले,
काळीं कमळें डोळे मिजले,

नाकाची चांफेकळी म्लानशी,
साजूक नाजूक ही गुल्बशी !

हासते हिला ही सदाफुली,
चमेली म्हणते कीं, 'ही खुळी',

मुरडते नाक मोगरी ही,
लावते तोंडास शेव जुई,

म्हणून कां हिची ही नाखुशी ?
साजूक नाजूक ही गुल्बशी !

मायेनें हिला मी उचलितों,
लाडानें हिला मी कुर्वाळितों,

हुंगतों, चुंबतों परोपरीं
खेळतों मी हिच्याबरोबरी

फुलेल म्हणजे ही निमिषीं
साजूक नाजूक ही गुल्बशी !

नागपूर, २४.८.४२

## ६८. कामकऱ्यांचें गाणें

[ फटका

अशा आमुच्या जीवनांत या आहे कांहीं का 'राम' ?
पळभर नाहीं फुर्सद आम्हां ! तिळभर नाहीं आराम !

भगभग दगदग आठप्रहर नी वणवण चणचण कायमची !
काळजिच्या कातरींत काळिज ! पदोपदीं विपदा जाची !

आम्हांपेक्षां भाग्यवंत हीं गुरें पाखरें खरोखरी
मन मानेतों चरती, फिरती मजेंत अगदीं दिवसभरी

आम्हांलागीं सवड कोठली सहल मोकळी करावया –
सृष्टीचें सौंदर्य निराळें डोळे भरुनी बघावया ?

झरझर धावे निर्झर त्यावर तुषार तारे चमचमती
वेळ कोठला इतुका आम्हां उभें राहुं कीं जवळ तटीं ?

सुगरिणिचीं तीं प्रेमळ वचनें – स्वस्थता न उत्तर द्याया,
गोड गोड खेळणें खिदळणें बाळांचें – सारें वाया !

व्यर्थ व्यर्थ हें जीवित हें तर निर्जिव यंत्रालयासम !
पळभर नाहीं फुर्सद आम्हां ! तिळभर नाहीं आराम !

नागपूर, २५.८.४२

## .६९. फुलास

[ प्रणयप्रभा

तूं फुलसी आपोआप फुला !
फुलवी का कोणी बळें तुला ?

फुला ! खरोखर तूं सुंदरता,
खरोखरच तूं फुला ! मधुरता,
तूंच खरोखर फुला ! मृदुलता,
रे ! तूं देवाची दिव्य कला !

अवकाशीं तूं गंध विखरसी,
दिशे दिशेला मोद वितरसी,
धन्य आपुलें जीवित करसी
तुजशीं न कुणाची होइ तुला

देसी मोदामोद मात्र तूं !
तुझा तोच ना जीवनहेतू ?
अत्तर, शर्बत, तेल परंतू
व्यवहारी वांच्छी तुजशिं भला !

तो तव कोमल काया चुरडी,
तुझी सहज तो नरडी मुरडी,
प्राण तुझे तो कुपींत कोंडी,
पिरगळी तुझ्या तो दलादला !

नागपूर, २७.९.४२

## .७०. एक चित्र !

[ फटका

माळ मोकळा भंवतीं मध्यें उंच वशिंडापरी परी –
एकटीच ही बरडटेकडी, तिच्या बोडक्या शिरावरी –
गभीर काळ्या अपरात्रीं या कोणी काय जरत्कारू ! –
अस्थिपंजरप्राय उभा हा जीर्ण शीर्ण निष्पर्ण तरू ! !

पहा ! पसरल्या उंच खालवर अगणित शाखाशिखा कशा !
शरीरांतल्या कुड्या वाकुड्या बारिकसारिक शिरा जशा !
बुंध्यापासुन पुढें उमटली स्पष्ट साउली बघा, कशी –
समोर ठेवुन यंत्र घेतली सुंदर छायाछबी जशी ! !

नील नभाच्या पार्श्वभूमिवर उठुनी अगदीं दिसेल कीं –
अशा रीतिनें कृष्ण-धवल हें रेखाचित्र कुणी रेखी !
रात्र–चांदण्या मिळुन साधल्या प्रकाश–छाया–छटा कशा !
टकमक टकमक बघत राहिल्या प्रेक्षणीय हें चित्र दिशा ! !

नागपूर, २३.३.४३

## .७१. ये वसंत ! ये, ये

[ भैरवी

शिशिर पळे दूर भयें
ये वसंत ! ये, ये
वेलि वेलि झुलव फुलव,
वृक्ष वृक्ष डुलव फळव ;
कोकिळांत,
बुलबुलांत –
स्फुरव गीतवाद्यें !
कुसुमांचे चषक भरुन,
रुचिर फळें सांद्र करुन –
पाखरांस,
मधुकरांस –
पाज मधुर मद्यें !
अवकाशीं झोक गंध
कर दिशेदिशेस धुंद,
येथ सतत –
राहि हसत,
कर वृथा न जा-ये !

नागपूर, १८८.४३

# टीपा

कवितांचे
क्रमांक

१ माझें आजोळ वांईस आहे. त्यास अनुलक्षून 'ज्यापासून मदीय पिंड उपजे' ही ओळ लिहिली आहे.

२ पांचगणीच्या पठारावर पावसाळ्याच्या आरंभीं जी शोभा दिसते ती पाहून हें सुनीत उत्स्फूर्त झालें आहे.

३ जोधपूरच्या आसमंतांत लाल दगडांच्या अनेक खाणी आहेत. त्यांपैकीं एक खाण जवळच 'सूरसागर' येथें आहे.

४ सुप्रसिद्ध क्रान्तिकारक यतींद्रनाथ दास ह्यांचा छळ झाला व कारागृहांतच त्यांना मृत्यु आला. त्यावर 'फ्री प्रेस जर्नल' मध्यें अग्रलेख आला होता. तो वाचून हें सुनीत लिहिलें आहे.

६ सुप्रसिद्ध चित्रकार श्री० ठाकुरसिंग ह्यांनीं काढलेलें ओलेत्या स्त्रीचें चित्र अगोदर 'शिशिर' ह्या इंग्रजी मासिकांत व नंतर 'रत्नाकरां'त आलें होतें. त्यावर प्रस्तुत गीत आहे.

८, ९, १५ हीं तिन्ही गीतें लॉर्ड बायरन्‌चें चरित्र व काव्य वाचीत असतांना सुचलीं आहेत. नवव्या गीताच्या मुळाशीं बर्न्सच्या खालील ओळी आहेत. त्या बायरननें आपल्या एका काव्यावर दिल्या आहेत — Had we never lived so kindly
Had we never lived so blindly
Never met or never parted
We had never been broken-hearted.

१७ 'Only Yesterday' ह्या चित्रपटाची नायिका प्रियकरानें केलेल्या वंचनेनें खचून न जातां स्वतः कुमारी राहूनच त्याच्या व त्याच्या नवपरिणिता वधूच्या सुखांत आपलें सुख मानते त्या प्रसंगावर हें गीत आहे.

२६ जीवनकलहांत टिकून राहिलें पाहिजे हें तत्त्व विशद करण्यासाठीं 'दीपका' वर अन्योक्ति.

३० घटस्फोटाची सोय नसलेल्या वरिष्ठ हिंदु समाजांतील एका अभागिनी परित्यक्तेचें स्वभावचित्र.

३२ अकारण टाकण्यांत आलेल्या एका प्रथम विवाहितेचें स्वभावचित्र.

३७ ‘ सागरा ’ प्रमाणें गंभीर असणाऱ्या एका व्यक्तीवरील अन्योक्ति.

३९ एका नैसर्गिक देखाव्याचें शब्दचित्र.

४४ ‘ डोळे घरीं चार ’ ही ओळ पत्नी व पुत्री ह्यांस उद्देशून.

५० गेल्या युरोपीय महायुद्धाच्या प्रसंगीं.

५२ एका संशयी स्त्रीच्या स्वभावावरील विनोदी नाट्यगीत.

५३ ‘ जीवन हा एक कधीं न संपणारा प्रवास आहे आणि संसार ही एक धर्मशाळा आहे ’ ह्या कल्पनेवरील रूपकात्मक गीत.

५७ असाहाय्य हिंदु विधवेचें स्वभावचित्र.

६४ चिरंजीवांचें कौतुक.

६५ जोधपुरास असतांना एक मारवाडी लोकगीत ऐकलें होतें. त्याच्या आधारें हें वत्सलगीत स्फुरलें आहे.

६६ लॉर्ड टेनिसन्च्या Haunted House ह्या कवितेंतील मध्यवर्ती कल्पनेचा ह्या कवितेंत उपयोग केला आहे. मृत शरीर म्हणजेच भुताटकीचें घर आहे ही ती कल्पना होय.

६७ कन्येचें कौतुक. ‘ स्त्री ’ मासिकांत प्रसिद्ध झालेल्या सौ. संजीवनी मराठे ह्यांच्या ‘ सोनसळी ’ ह्या नितांत मधुर वत्सलगीताची चाल ह्या कवितेस लावली आहे

६८ W. H. Davies ह्यांच्या Leisure वरून ही कविता सुचली आहे.

६९ कलावाद आणि उपयुक्ततावाद ह्यांवरील एक प्रतीकगीत.

७० एका नैसर्गिक देखाव्याचें शब्दचित्र.

# कवितांचे प्रथम चरण


| कवितेचा क्रमांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| ६८ | अशा आमुच्या जीवनांत या आहे कांहीं का ' राम ' ? | ८२ |
| २३ | आज उगवला शुभमंगल दिन | २७ |
| ४८ | आला पर्जन्यराज | ५५ |
| ३८ | उघड उघड निज रम्य नेत्रपद्म प्रियतम ! | ४४ |
| २८ | उदास सायंकाल सुनें सुनें भंवताल | ३२ |
| ११ | ' एकजीव होइलना आपुला ? शुभांगे ! ' | १२ |
| ४१ | ओतिलेस तूंच तदा जीवनांत संजीवन | ४७ |
| ४४ | अंधार ! अंधार ! ! पडला सभोंवार ! | ५० |
| ५१ | कर हवन अगोदर प्राण तुझे | ५८ |
| ५ | केव्हां तोडुन ताडताडकन् या पायांतल्या शृंखला | ५ |
| ४७ | कोठें ती मुमताज आज अथवा शाहेजहाँ तो कुठें ? | ५४ |
| ४६ | क्रान्तिदेवी ! तुझा उदय अक्षय असो ! | ५३ |
| ३५ | खचित तुझें चलन वलन चपल चारुगात्री ! | ४१ |
| ६५ | खेळव चिमणा माझा, चिमणे ! | ७८ |
| १४ | गर्द रान मातलें, रातली त्यांत जर्द केतकी | १५ |
| ८ | गळ्यांत घालुन गळा कशाला मला लाविसी लळा ? | ९ |
| ७ | गे ! ओठांवर शब्द अस्फुट असे आले कितीदां तरी | ८ |
| ६४ | गृहसाम्राज्यावरी गाजवी हा अनियंत्रित सत्ता | ७६ |
| ४३ | चल, दूर कुठें तरि जाउं कसें | ४९ |
| ५३ | चाल रे ! प्रवासी | ६० |
| २४ | जसें शोभे आकाश तें निरभ्र | २८ |
| ४२ | जाऊं दूर चला ! पुराजवळुनी रानीं कुठें बाजुला | ४८ |
| ४९ | जातिल जातिल निघुन हेहि दिन | ५६ |
| ९ | जाहली वृथा आधीं भेट आपुली राया ! | १० |
| १९ | जो जो जो कलिके ! | २३ |

३२ टाकुन मज जासि कुठें ? ३७
३१ ठेव झुलत सागरास चारुचंद्रिके ! ३६
२१ डोळे हे सखि ! आळसलेले २५
५२ तुम्हि जशी समजतां तशी मुळीं मी नाहीं ५९
३७ तुला न ओळखलें सागरा ! तुला न ओळखलें ४३
६९ तूं फुलसी आपोआप फुला ! ८३
१ त्वत्तीरीं पद ठेवतांच उठती रोमांच आनंदुनी १
२६ दीपका ! कां इतुका थरकांप ? ३०
५५ दूर कुठेंतरि जाणें गऽ ६३
२० देखिलें तुज न जों स्नेहसंमीलनीं २४
५० धन्य धन्य मानवते ! हीच कां तुझी प्रगती ? ५७
२९ नाहीं ना जडलें पिसें तुज ? अरे चंद्रा कलानायका ! ३३
३९ नील जलाशय त्यावरि कतिपय उठती तरल तरंग ४५
२ नैऋत्येकडल्या नगावरुनिया आतां पठारावरी – २
४० प्रदीप्त दीपा ! तुझीं फांकती प्रकाशकिरणें सभोंवतीं ४६
३ प्रांत अवघा हा बरड डोंगराळ ३
५६ फुलो फळो तरु ही इच्छा तर ६४
१३ फूलपाखरा ! खरा गडी तूं रंगेला साजिरा १४
१८ बघ ! बालविभाकर ये उदया २२
१६ बोलुं नका मजसि प्रिया ! २०
१२ भयविवश उभी कां दूर तशी १३
५९ भाग्यवंत धनवान खरोखर ६९
३० मजपरी खरोखरि कमनशिबी कुणि नसे ! ३४
५४ मन करुनि मोकळें हास हास ६१
२५ मला मोहि माझी प्रिया सांवळी ! २९
५७ माहेर सोडुनी जाउं कशी ? ६५
७० माळ मोकळा भंवतीं, मध्यें उंच वशिंडापरी परी – ८४
१५ यापुढतीं हा जीव – जिवलगे ! १९

६० येवो ! येतो जवळ शिशिर जर, ७०
३४ राजा ! तव एका हातीं आहे सत्ता, ४०
६७ रुसली फुगली कां ग ! अशी ? ८१
६२ वाजवितें सहज कोण अंतरिंचें मूक यंत्र ? ७४
१० वेगवेगळीं फुलें उमललीं रचुनी त्यांचे झेले ११
७१ शिशिर पळे दूर भयें ये वसंत ! ये, ये ८५
५८ समोर चमके सायंतारा ६६
३३ सवड मिळते जेव्हां जेव्हां मला लवही गडे ! ३९
१७ सहज कैंवि विस्मरसी प्रियतमा ! मला ? २१
४ संबोधो कुणि बंडखोर म्हणुनि स्वातंत्र्यवीरांस या ! ४
६ स्नात देवते ! चैल विरल ओलेतें ! ६
३६ हळुहळु सरे मागें मागें अधोमुख यामिनी ४२
४५ हास हास तारे ! ५१
६३ हे अजरामर रससिद्ध कवे ! ७५
६६ हे असे कसे भाडेवाले ? ७९
६१ होती आज हवाई हल्ले ७२
२७ हृदयाच्या घरट्यांत उबविसी दुःखाचें अंडें ३१
२२ क्षणहि अतां सखि ! लाविं विलंब न २६



REFBK-0007482
REFBK-0007482
वा. क्र. 0842

# महाराष्ट्र कवि-परंपरा । खंड न पडला तिला जरा ।

मराठी कवितेचें भवितव्य उज्ज्वल आहे काय ? आमच्या मतें खचित आहे. परंतु ‘उणीव रसिकांचीच खरी । आज भासते परोपरी ।’ हेंही कांहीं अंशीं खरें आहे. आम्ही आपल्या परीनें ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहों. खालील कांहीं उत्तमोत्तम काव्यसंग्रह आमच्या या म्हणण्याची प्रचीति आणून देतील. मराठी कवींचे सुंदर काव्यसंग्रह अल्प किंमतींत प्रकाशित करण्याचा आमचा हा उपक्रम रसिकांना आवडेल अशी आमची खात्री आहे.

**सावरकरांची कविता**
संपादक : प्रा. वा. गो. मायदेव, १॥ रु.

**मधुपर्क**
पुरुषोत्तम मंगेश लाड, १ रु.

**मानसमेघ**
गिरीश, १॥ रु.

**यशोगिरि**
राजकवि यशवंत, १॥ रु.

**ओजस्विनी**
राजकवि यशवंत, १॥ रु.

**पेर्ते व्हा**
अनिल, ४ रु.

**तांबे यांची समग्र कविता**
संपादक : प्रा. वा. गो. मायदेव, ३॥ रु.

**उज्ज्वला**
कु. ब. निकुम्ब, १। रु.

**भावतरंग**
वा. गो. मायदेव, १ रु.

**भावनिर्झर**
वा. गो. मायदेव, १ रु.

**सुधा**
वा. गो. मायदेव, १ रु.

**गरिबांची गोष्ट**
वा. गो. मायदेव, १२ आणे

**रुपेरी रसधारा**
स. अ. शुक्ल, १॥ रु.

**चंदेरी लहरी**
शांताराम आठवले, १॥ रु.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई